# महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे-०४

उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ. १२ वी) व माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ. १० वी) परीक्षेसाठी राज्यमंडळ स्तरावर समुपदेशक नियुक्तीबाबत.

## प्रकटन

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे फेब्रुवारी-मार्च २०२४ मध्ये घेण्यात येणाऱ्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ. १२ वी) परीक्षा दि. २१/०२/२०२४ ते दि. १९/०३/२०२४ तसेच माहिती तंत्रज्ञान (I.T.) व सामान्य ज्ञान (G.K.) या विषयाची ऑनलाईन परीक्षा दि. २०/०३/२०२४ ते दि. २३/०३/२०२४ व माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ. १० वी) परीक्षा दि. ०१/०३/२०२४ ते दि. २६/०३/२०२४ या कालावधीत पुणे, नागपूर, छत्रपती संभाजीनगर, मुंबई, कोल्हापूर, अमरावती, नाशिक, लातूर व कोकण या नऊ विभागीय मंडळांमार्फत आयोजित करण्यात आलेली आहे.

परीक्षेच्या काळात अनेक विद्यार्थी नकारात्मक विचाराने किंवा परीक्षेच्या भितीने मानसिक दडपणाखाली असतात. अशा विद्यार्थ्यांना नैराश्यातून बाहेर काढण्यास मदत करण्यासाठी ऑनलाईन समुपदेशन करण्याकरीता राज्यमंडळ स्तरावरून समुपदेशकांची नियुक्ती करण्यात आली आहे. त्यांचे भ्रमणध्वनी क्रमांक खालीलप्रमाणे आहेत.

| | | | |
|---|---|---|---|
| १) ७३८७४००९७० | २) ९०११९८४२४२ | ३) ८४२११५०५२८ | ४) ८२६३८७६८९६ |
| ५) ८३६९०२१९४४ | ६) ८८२८४२६७२२ | ७) ९८८१४१८२३६ | ८) ९३५९९७८३१५ |
| ९) ७३८७६४७९०२ | १०) ९०११३०२९९७ | | |

उपरोक्त भ्रमणध्वनी क्रमांक दिलेले समुपदेशक परीक्षा कालावधीत सकाळी ८-०० ते रात्री ८-०० या कालावधीतच विद्यार्थ्यांना भ्रमणध्वनीव्दारे निशुल्क आवश्यक ते समुपदेशन करतील. मात्र विद्यार्थी, पालक यांनी परीक्षा केंद्र, बैठक व्यवस्था व प्रश्नपत्रिकेसंबधित प्रश्न इत्यादींबाबत समुपदेशकांना विचारणा करू नये याची नोंद घ्यावी.

दिनांक :-१४/०२/२०२४

(अनुराधा ओक)
सचिव,
राज्य मंडळ, पुणे ०४.

---

क्र. कोविमं./आस्थापना/ ३३२५
दिनांक : २१/०२/२०२४

प्रति,
सर्व मुख्याध्यापक/प्राचार्य,
माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालय,
सातारा/सांगली/कोल्हापूर.

उपरोक्त प्रकटन आपल्या शाळा/क.महाविद्यालयाच्या नोटीस बोर्डावर लावावे. तसेच ते आपल्या शाळेच्या / कनिष्ठ महाविद्यालयांच्या प्रत्येक विद्यार्थ्यास निदर्शनास आणावे. कोणताही विद्यार्थी सदर माहितीपासून वंचित राहणार नाही, याची खबरदारी घ्यावी.

(सुभाष रा. चौगुले)
विभागीय सचिव,
कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर